# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 487/2022 दिनांक : 19.12.2022**

## 1)दरोडा :-

**अर्धापुर :-**दिनांक 17.12.2022 रोजी 21.45 वा. चे सुमारास, **शनी पाटीपासुन थोडयाच अंतरावर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा मंगेश महाजन यांचे किराणा दुकान बंद करून गावाकडे पार्डी येथे जात असतांना शेनी पाटी पासुन थोडयाच अंतरावर पाठीमागुन सात अनोळखी इसम एक मोटार सायकलवर तीन दुसऱ्या मो सा वर चार असे एकुण सात आरोपीतांनी फिर्यादीच्या गाडीस ओव्हरटेक करून फिर्यादीच्या मो सा समोर त्यांनी दोन्ही मो सा आडव्या लावुन त्याच्या पैकी एक उंच व बॉडी बिल्डर आरोपीने खंजरचा धाक दाखवुन थापडबुक्याने मारहाण करून नगदी 1700/-रूपये व सॅमसंग कंपणीचा जुना वापरता किंमती 7000/-रूपये असा एकुण 8700/- रुपयाचा माल जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी माधव बालाजी अन्नपुर्ण, वय 28 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. पार्डी ता. अर्धापुर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 340/2022 कलम 395, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोउपनि/सुरवसे, मो नं. 9766105366 हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरीचा प्रयत्न :-

**शिवाजीनगर :-**दिनांक 17.12.2022 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **आयटीआय कॉर्नर नांदेड येथे,** यातील फिर्यादी ही ॲटोत प्रवास करताना साईनाथ बालाजी सुर्यमुखे, वय 19 वर्षे, रा. गोविंदनगर नांदेड याने महिला फिर्यादीचे गळयातील एक तोळा सोन्याचे मनी मंगळसुत्राची पोत जबरीने चोरण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी मायावती भ्र. तुकाराम कांबळे, वय 62 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. सांगवी बु. त्रिरत्ननगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 447/2022 कलम 393, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री हैबतकर, मो.क्रं. 9922951629** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :-

**1)विमानतळ :-** दिनांक 16.12.2022 रोजी 08.00 वा. ते दि. 17.12.2022 चे 21.15 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी विद्युतनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे लग्नानिमीत्त निजामाबाद येथे जावुन परत आले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे राहाते घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरातील कपाट फोडुन कपाटातील चांदीचे साहित्य किंमती 45,000/-रूपयाचे जुने वापरते चोरून नेले. वगैरे **फिर्यादी बळवंत रामकृष्ण व्यवहारे, 53 वर्षे, व्यवसाय खाजगी शिकवणी रा. विद्युतनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 429/2022 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/591 नागरगोजे, मो.क्रं. 8412879395** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :-** दिनांक 15.12.2022 रोजी 10.00 ते दि. 17.12.2022 चे 01.30 वा. चे दरम्यान, **केशवेनगर हनुमानगड फिर्यादीचे राहाते घरी नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे लॉक तोडुन आत प्रवेश करून कपाटातील सोन्याचे काळे मनी मंगळसुत्र 5 ग्रॅम किंमती 15,000/-रूपये व सोन्याचे कानातील फुले 2 ग्रॅम किंमती 7,000/-रूपये असा एकुण 22,000/-रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले आहे. वगैरे **फिर्यादी बाबुराव नारायण काटे, वय 57 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. केशवेनगर हनुमानगड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 428/2022 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/कुरूळेकर, मो.क्रं. 9923696704** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :-

**1)बिलोली :-** दिनांक 17.12.2022 रोजी 22.30 वा. ते दिनांक 18.12.2022 रोजी 03.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घराचे अंगणातुन मौ. बोळेगाव ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो ग्लॅमर कंपनीची मो सा. क्रं एमएच-26/एएल-3320 किंमती 30,000/-रुपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयांने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी गंगाधर विठ्ठलराव मोघे, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. बोळेगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरन 244/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2049 आंबेवार, मो. क्रं. 9423615487** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 06.12.2022 रोजी 10.00 ते 19.30 वा. चे दरम्यान, **धर्मले हॉस्पीटल माणीकनगर समोरून नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपनीची मो सा. क्रं एमएच–38/आर–3065 किंमती 30,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयांने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सय्यद अजमत नियमत, वय 31 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. पिरबुऱ्हान नगर गल्ली नं 13 नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 465/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2178 गोणारकर, मो. क्रं. 9689715358** हे करीत आहेत.

## 5)जनावर चोरी :–

**देगलुर** :–दिनांक 18.12.2022 रोजी चे 12.30 ते 12.45 वा. चे दरम्यान, **रफाई दर्गा जवळील मोकळया जागेत देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व साक्षीदार यांचा एक बकरा किंमती 8,000/–रुपये व एक शेळी किंमती 10000/–रूपयाची असा एकुण 18,000/–रूपयाच्या चोरून नेण्याचा प्रयत्न करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी शेख अफसर शेख पाशु, वय 26 वर्षे, व्यवसाय मेकॅनिक रा. रफाई दर्गा नरंगल रोड देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 551/2022 कलम 379, 511 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2822 कनकवळे, मो. क्र. 9821159844** हे करीत आहेत.

## 6)गंभीर दुखापत :–

**1)सोनखेड** :–दिनांक 17.12.2022 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीच्या राहाते घरा समोर मौ. पिंपरणवाडी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन ग्रामपंचायत निवडणुकीचे कारणावरून फिर्यादी व साक्षीदार हे त्यांचे घरासमोर उभे असतांना फिर्यादीचा भावाची निवडणुक आहे. कोणीतरी निवडुन येईल तु शिवीगाळ करू नको असे म्हणता आरोपीतांने फिर्यादीचे भावास, आईस दगडाने व लोखंडी रॉडने मारहाण करून डोळयाचे खवणीवर मारून गंभीर दुखापत केली. व कमरेवर काठीने मारहाण केली. फिर्यादीचे आईस आरोपीने डोक्यात लोखंडी रॉडने मारून गंभीर दुखापत केली. फिर्यादीस लाथा बुक्याने व दगडाने मारहाण केली. तसेच फिर्यादीचे वडीलास व भावजय सुनिता यांना दगडाने काठीने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी तानाजी माधवराव जाधव, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. पिंपरवाणी ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरन 178/2022 कलम 326,324,323,504,506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/1927 अशोक भुत्ते, मो. नं. 9421292819** हे करीत आहेत.

**2)माळाकोळी** :–दिनांक 18.12.2022 रोजी 11.30 वा. चे सुमारास, **जि. प. शाळे समोरील सार्वजनिक रोडवर मौ. उमरज ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन ग्राम पंचायत निवडणुकीचे कारणावरून हातात कुऱ्हाड घेवुन यातील फिर्यादीस तु आम्हाला मतदान केला नाहीस व आमचे पैसे घेतला नाहीस म्हणुन शिवीगाळ करून फिर्यादीचा भाऊ विश्वांभर देवराव भुत्ते यास लाथा बुक्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादी हा सोडविण्यास गेला असता त्याचे डोक्यात कुऱ्हाडीने मारून डोके फोडुन दुखापत केली. लाथा बुक्याने मारहाण करून व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी दिगांबर देवराव भुत्ते, वय 34 वर्षे, व्यवसाय खाजीगी ड्रायव्हर रा. उमरज ता. कंधार जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरन 126/2022 कलम 143, 147, 148, 149, 324, ,323,504,506, भादवि सह कलम 135 मुंबई पोलीस अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/आडे, मो. नं. 9970125563** हे करीत आहेत.

## 7)अपघात :–

**उस्माननगर :–** दिनांक 10.12.2022 रोजी 20.00 वा. चे सुमारास, **माळ कौठा ते कौठा फाटा जानारे डांबरी रोडवर संजय ढगे यांचे शेताजवळ मौ. येळी ता. बसस्थानक जवळ ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे पांडुरंग बालाजी ढगे, वय 35 वर्षे, रा. येळी ता. लोहा जि. नांदेड** यास यातील नमुद आरोपीन आपले ताब्यातील मो सा हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन चालवुन स्लीप झाल्याने यातील मयताचे डोक्यास गंभीर मार लागल्याने येशोसाई येथे उपचार चालु असतांना दिनांक 11.12.2022 रोजी दुपारी 03.00 वा. मरण पावला आहे. नमुद आरोपी हा यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. व स्वताही जखमी झाला आहे. फिर्यादी दुखात असल्यामुळे गुन्हा उशिरा दाखल झाला आहे. वगैरे **फिर्यादी दिगांबर मारूती ढगे, वय 25 वर्षे, व्यवसाय टेलर व शेती रा. येळी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्मानगर** गुरनं. 201/2022 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/प्रभु केंद्रे, मो.क्र. 8378989949** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**1)विमानतळ :–** दिनांक 18.12.2022 रोजी 16.45 वा. चे सुमारास, **सार्वजनिक ठिकाणी हातोडा चौक सांगवी बु. नांदेड येथे**, यातील नमुद सहा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या रम्मी नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना एकुण 7070/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री विजय दौलतराव जाधव, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 430/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1234 जाधव, मो.क्रं. 8805859640** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड